दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | मंगळवार दि.१७ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१०९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## मना विरोधात घडत असताना पुढे जाणारा खरा कार्यकर्ता

**नागपुर (वृत्तसंस्था)**–राज्यात महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात भाजप नेते सुधीर मुनगंटीवार तसेच माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांना मंत्रिपद डावलल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे नागपुरात उपस्थित असून देखील सुधीर मुनगंटीवार विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला गैरहजर असल्याचे समोर आले आहे. पावला पावलांवर मना विरोधात घडत असताना जो पुढे जातो तो खरा कार्यकर्ता, असे म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या भावना देखील व्यक्त केल्या आहेत.भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांना विचारणा केली असता, त्यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी नाराज असण्याचे करण नाही. पक्षाने जे आदेश दिले, जी जबाबदारी दिली त्यांचे पालन करणे हेच मइ आजवर करत आलो आहे. मात्र आज विधिमंडळाचे फार काही काम नसल्याने मी गैरहजर राहिलो असल्याचे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.

### एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत नाराजीचा भडका

# मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने ५ बडे नेते नाराज,एकाचा शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचा रविवारी मंत्रिमंडळ विस्तार झाला. त्यात शिवसेनेच्या अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे व प्रकाश सुर्वे ५ बड्या नेत्यांना स्थान मिळाले नाही. त्यामुळे आता या नेत्यांसह त्यांचे शेकडो समर्थक अस्वस्थ असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या ५ जणांसह अन्य एका नेत्याने तर शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा देऊन आपली खदखद व्यक्त केली आहे. यामुळे आगामी दिवसांत सत्ताधारी शिवसेनेत मोठे राजकारण रंगण्याची चिन्हे आहेत.महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या कोट्यातून शंभूराज देसाई, उदय सामंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर या ९ जणांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. तर आशिष जयस्वाल व योगेश कदम यांना राज्यमंत्रिपद मिळाले. या विस्तारातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोडचे आमदार तथा माजी मंत्री अब्दुल सत्तार, माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत व माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना वगळण्यात आले.याशिवाय विजय शिवतारे व प्रकाश सुर्वे या दोन नेत्यांचाही यावेळी मंत्रिमंडळात समावेश होणार असल्याची माहिती होती. पण भाजपच्या दबावामुळे या पाचही नेत्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली नाही. आता हे नेते नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अब्दुल सत्तार यांनी या प्रकरणी अद्याप आपली प्रतिक्रिया




नाही. तर तानाजी सावंत हे नॉट रिचेबल आहेत. त्यांच्या कार्यालयाने पत्रकारांना सावंत प्रतिक्रियेसाठी सध्या उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे.दुसरीकडे, दीपक केसरकर यांनी पक्षश्रेष्ठींचा निर्णय मान्य असल्याचे सांगत आपण पक्षावर नाराज नसल्याचे सांगितले आहे. मी पक्षाच्या निर्णयावर नाराज नाही. माझ्या चेहऱ्यावरही कुठे नाराजी दिसत नाही. जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले आहे. त्यामुळे त्या स्पीरिटने काम देखील झाले पाहिजे. आता नवे सरकार व त्याचे मंत्री आलेत. नव्या मंत्र्यांच्या चेहऱ्यावर किती आनंद आहे हे पाहा. त्यांच्या आनंदात आपण सहभागी झाले पाहिजे, असे ते म्हणालेत.
विजय शिवतारे यांनीही या प्रकरणी आपली नाराजी उघडपणे मांडली आहे. हा मंत्रिमंडळ विस्तार मला विश्वासात न घेता झाला. त्यामुळे आता अडीच वर्षांनी मला मंत्रिपद दिले तरी मी ते घेणार नाही, असे ते म्हणालेत. आमदार प्रकाश सुर्वे यांनीही या प्रकरणी आपली नाराजी व्यक्त केली.दरम्यान, मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या भंडारा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनीही आपल्या मनातील खदखद व्यक्त केली आहे. त्यांनी मंत्रिपद न मिळाल्यामुळे उघडपणे एकनाथ शिंदेंवर टीका करत देवेंद्र फडणवीस यांची भाजप येण्याची ऑफर नाकारल्याचा आता पश्चाताप होत असल्याचा दावा केला आहे. भोंडेकर यांनी यासंबंधी शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामाही दिला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आपल्या नाराज नेत्यांची कशी मनधरणी करणार याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच!

### शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण उघड

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी येथे आंबेडकरी आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा शव विच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये त्यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या संपूर्ण शरीरावर मारहाणीच्या खुणा स्पष्टपणे दिसत असल्याचे अहवालात म्हटले आहे.
संविधानाची विटंबना झाल्याने परभणी शहरात आंबेडकरी जनतेने निषेध आंदोलन केले. यामध्ये पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांवर लाठीचार्ज केला. अनेक निरपराध तरुणांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली. यामध्ये सूर्यवंशी यांचा समावेश होता. त्यांचा



Department Of Forensic Medicine And Toxicology
GOVT. MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, AURANGABAD 431001
PM ID: 2900/ 2024
PROVISIONAL POST-MORTEM REPORT cum MEDICAL CERTIFICATE OF CAUSE OF DEATH
DECLARED DEAD at government hospital parbhani, state- maharashtra
Name of Deceased: SOMNATH VYANKAT SURYAWANSHI
Address of Deceased: SHANKAR NAGAR, PARBHANI
Gender: MALE | Age : 35 YEARS
Date of P.M.: 16-12-2024
Immediate Cause: (a.) SHOCK FOLLOWING MULTIPLE INJURIES
Manner of Death: PENDING INVESTIGATION



रविवारी (दि.१५) पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर परभणी शहरात दाखल झाले आहेत. ड. प्रकाश आंबेडकर यांनी सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टम ऑन कॅमेरा करावा अशी मागणी केली होती. तसेच सूर्यवंशी यांना आम्ही न्याय मिळवून देऊ. त्यांच्या न्यायासाठी लढा देणार असल्याचेही ड. आंबेडकर यांनी म्हटले आहे.

## मोटारसायकल चोरांची आंतरजिल्हा टोळी अंबाजोगाई जेरबंद; १९ मोटारसायकल जप्त

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई गुप्त माहितीच्या आधारे बीड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अंबाजोगाईत सापळा लावून मोटारसायकल चोरांच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला. यावेळी चोरट्यांकडून १९ मोटारसायकलसह जवळपास ९ लाख मुद्देमाल जप्त केला अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल चोरीच्या गुन्ह्यातील मोटारसायकल वीरसिंग शेरसिंग गोके (रा. सा.बां. कार्यालय जवळ, सदर बाजार रोड, अंबाजोगाई) याने चोरली असून तो चोरीच्या गाड्या विक्री करण्यासाठी चनई रोडवरील सीताफळ संशोधन केंद्राजवळ येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेस मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरिक्षक उस्मान शेख यांनी त्या परिसरात सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहताच पळून जाण्याच्या बेतात असणाऱ्या वीरसिंगला पोलिसांनी पाठलाग करून



पकडला. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने घरात लपवलेल्या दहा मोटारसायकल पोलिसांना दाखवल्या. तसेच, त्याने गाडी विकताना फायनान्सची असल्याचे कारण भासवुन कागदपत्र नंतर देतो असे सांगत आठ मोटारसायकल विकल्या होत्या. पोलिसांनी या सर्व १८ मोटारसायकल जप्त केल्या. पोलीस वीरसिंगच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली, पीएसआय सुशांत सुतळे, पोलीस कर्मचारी मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे व चालक नितीन वडमारे यांनी केली

## पोलीस प्रशासन आणि कृषी उत्पन्न बाजार समितीने सोमवारच्या आठवडी बाजारात वाहनांना प्रवेश बंदी करावी–अॅड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी मध्ये सोमवारी आठवडी बाजार भरतो या बाजारामध्ये अनेक शेतकरी आपला शेतातील पालेभाज्या सह विविध पदार्थ विकण्यासाठी आणतात मात्र बाजारामध्ये चार चाकी आणि दुचाकी वाहने सर्रासपणे काळजी न घेता चालवली जातात याचा नाहक त्रास शेतकऱ्यांसह बाजारात येणाऱ्या लोकांना होत आहे म्हणून परळी पोलीस प्रशासनाने तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीने याकडे तातडीने लक्ष देऊन वाहनांना आठवडी बाजारात बंदी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केली आहे. परळी वैजनाथ ते



तालुक्याचे ठिकाण असून दर सोमवारी आठवडी बाजार भरवला जातो. हा बाजार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून भरवला जातो मात्र या आठवडी बाजारात दुचाकी आणि चार चाकी वाहनधारकांच्या व्यत्ययामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांना नाहक त्रास भोगाव लागत आहे. अगोदरच खरेदीसाठी बाजारामध्ये नागरिकांची लगबग मोठ्या संख्येने असते. त्यामध्ये वाहनांचा नाहक त्रास होतो. युवक मंडळी ही भरघाव वेगाने वाहन बाजारातून चालवता याचा परिणाम वाहनांमुळे अपघात तसेच किरकोळ जखमी होण्याची अधिक संभवते.आठवडी बाजारात महिलांची लक्षणीय संख्या असते कारण याच दिवशी संपूर्ण आठवडाभराचा बाजार महिला खरेदी करतात म्हणून या गंभीर बाबीकडे पोलीस प्रशासन आणि कृषी उत्पन्न बाजार समितीने लक्ष घालून नागरिकांची हेळसांड थांबवावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

## सोमनाथ सूर्यवंशी अमानुष खून प्रकरणात आरोपींना फाशी द्या

### अमोल दादा मित्रमंडळाची मागणी



**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

परभणी येथील संविधान विटंबना प्रकरणी व डइइ चे विद्यार्थी सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या अमानुष मारहाणीत झालेल्या मृत्यू प्रकरणी दोषी पोलिसांवर गुन्हे दाखल करा व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटूंबास ५० लाखाची मदत करावी या मागणीसाठी आजगंगापूर तहसीलदार यांना निवेदन देऊन कडक कारवाईची मागणी अमोलदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आली.व परभणी घटनेचा निषेध करण्यात आला.

## मोरावे गावासाठी खेळाच्या मैदानाचे लोकार्पण

### महेंद्र शेठ घरत यांच्या प्रयत्नांना यश!

**उरण । विठ्ठल ममताबादे**

सिडको ने सिमेंटची जंगले उभे केले मात्र येथील स्थानिक प्रकल्प प्रकल्पग्रस्तांसाठी खेळाची मैदाने सिडकोच्या आराखड्यामध्ये नाहीत. याकरता झुंजार कामगार नेते तसेच रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र शेठ घरत यांनी अथक प्रयत्न केल्यानंतर सिडकोने मोरवे गावाकरता अधिकृत मैदान मंजूर करून देत माजी खासदार रामशेठ ठाकूर तसेच कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांच्या शुभहस्ते या मैदानाच्या लोकार्पण कार्यक्रम रविवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी मोरावे ग्रामस्थांच्या वतीने मोठा सत्कार करण्यात आला.
लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते फीत कापून तसेच श्रीफळ वाढवून मैदानाचे उद्घाटन करण्यात आले तर कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांच्या हस्ते खेळपट्टीचे




पूजन करून श्रीफळ वाढवून बॅटिंग केली.
स्वर्गीय दिबा पाटील तसेच जनार्दन भगत साहेब यांनी या भागाला मोठा इतिहास दिलेला आहे . १९८४ च्या आंदोलनातील काही किस्से सांगत कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांनी अन्यायाविरुद्ध पेटून उठले पाहिजे आपला हक्क आपण मिळवलाच पाहिजे , या मैदाना करता मोराव्यातील ग्रामस्थांनी चिकाटी सोडली नाही त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करेन.असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाप्रसंगी उत्तम कोळी श्रीकांत म्हात्रे ,लहू मात्रे ,मदन पाटील, निलेश खारकर, धावजी पाटील, विनायक पाटील ,चंद्रकांत म्हात्रे, सचिन म्हात्रे ,मयूर म्हात्रे ,यज्ञेश भोईर, प्रणय कोळी ,संजय पाटील, अमर म्हात्रे ,काशिनाथ म्हात्रे, मिलिंद म्हात्रे, चिंतामण गोंधळी, रुपेश ठाकूर ,उमेश ठाकूर, संकेत भोईर त्याचबरोबर इतर मान्यवर उपस्थित होते .

## घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मुदतीमध्ये ई-पीक पाहणी करून घ्यावी

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मुदतीमध्ये ई-पिक पाहणी करुन घ्यावी असे अवाहन घनसावंगी तहसिल कार्यालयाकडून करण्यात आले आहे.
पीकविमा, पीककर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमसपी अंतर्गत पिकांची नोंद, ग्रीस्टिक अंतर्गत सर्व योजना तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकाऱ्यांनी ठराविक मुदतीमध्ये ई पीक पाहणी करुन घेण्याची गरज आहे. कृषी, पशुसवर्धन, दुग्धव्यवसाय, विकास व मत्स्य व्यवसाय विभाग शासन निर्णया नुसार शेतकाऱ्यांना विविध योजनेंतर्गत लाभ देण्याकरिता ग्रिस्टक योजनेची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे. सदर योजना ही कर्ज, पिकविमा, पीएम किसान योजना, किसान क्रेडिट कार्ड्स आणि कृषी इन्फ्रास्टक्चर फंड व शेती विकासाकरिता इतर कर्ज, पीक कर्ज, पिक विमा, नैसर्गिक आपत्ती अंतर्गत देय नुकसान भरपाई, किमान आधार भुत किंमतीवर खरेदीमध्ये




ऑनलाइन नोंदणी या योजनेचा लाभ घेण्याकरिता सहाय्यभूत करणार आहे.
राज्यात ०१ डिसेंबरपासून रब्बी हंगाम सुरु झाला आहे. शेतकऱ्यांना यापूर्वी पिक पाहणीसाठी ई-पिक पाहणी मोबाइल प उपलब्ध होते. परंतु केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे यामध्ये तांत्रिक बदल करत डिजिटल क्रॉप सर्वे (डीसीएस) मोबाईल पच्या माध्यमातून संपुर्ण राज्यात ई-पीक पाहणी होणार आहे. शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणी करण्यासाठी ०१ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२५ ही मुदत असून सहाय्यक स्तरावर ई- पीक पाहणी करण्यासाठी ही मुदत आहे. शेतकरी स्तरावरून मोबाईल पद्वारे पीक पाहणी नोंद करण्यात येऊन शेतकरी स्तरावरील कालावधी संपल्यावर सहाय्यका मार्फत उर्वरित शेतकऱ्यांची पिक पाहणी अँपद्वारे नोंदविण्यात येते.शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून सहाय्यक उपलब्ध आहेत. डिजिटल क्रॉप सर्वे (डीसीएस) मध्ये गटाच्या हद्दीवर आधारित जिओ फेन्सिंग बंधनकारक करण्यात आलेली आहे. जोपर्यंत संबंधित खातेदार सहाय्यक निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाही, तोपर्यंत पिकाचे छायाचित्र काढता येत नाही. पीक पाहणी अपलोड करता येत नाही. तसेच, मोबाईलमध्ये जिओ फेन्सिंग असल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या गटामध्ये जाणे अनिवार्य आहे.शेतकऱ्यांना यापूर्वी पीक पाहण्यासाठी पाणी मोबाईल प उपलब्ध होते. परंतु यामध्ये तांत्रिक बदल करून डिजिटल क्रॉप सर्वे डीसीएस मोबाईल प उपलब्ध करून देण्यात आले आहे. याच पच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात ई-पीक पाहणी होणार आहे

संपादकीय

# दारुबंदीची नशा

'दारू काय पिता? दूध प्या' असे आदर्शवादी आवाहन करत बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी २ ऑक्टोबर, २०१६पासून राज्यात दारूबंदी लागू केली. बिहारमधील गुन्हेगारी कमी करणे, कौटुंबिक अत्याचाराच्या घटना नियंत्रणात आणणे आदी उदात्त हेतू ह्या घोषणेमागे होते. नितीश यांच्यावर असलेला गांधीवाद व समाजवादी विचारसरणीचा पगडाही या धोरणासाठी प्रेरक होता. मात्र हे धोरण लागू करण्यापूर्वी त्यासाठी आवश्यक असणारे वातावरण त्यांनी निर्माण केले होते का, कोणत्याही प्रकारचे मद्य उपलब्ध होऊ नये यासाठी आवश्यक ती प्रशासकीय सिद्धता केली होती का आदी प्रश्न उपस्थित व्हावेत अशी परिस्थिती सध्या बिहारमध्ये दिसत आहे. पैसेवाल्यांना सहज उपलब्ध होणारे उंची मद्य; लपूनछपून का होईना, परंतु कधीही मिळणारी गावठी व देशी दारू आणि पोलिस प्रशासनाचे त्यावर नसलेले नियंत्रण हे सर्व पाहता नितीश यांचे हे धोरण स्वप्नाळूच होते असे म्हणण्यास वाव आहे.

बिहार प्रोहिबिशन अँड एक्साइज अॅक्ट, २०१६द्वारे बिहारमध्ये दारूबंदी लागू करण्यात आली. या कायद्यानुसार राज्यात दारूचे उत्पादन, ने-आण, खरेदी-विक्री, साठा करणे यावर बंदी घालण्यात आली. या कायद्यांतर्गत प्रथम दोषी ठरल्यास तीन महिने तुरुंगवास व ५० हजार रुपये दंड या शिक्षेची तरतूद आहे. अधिक गंभीर गुन्ह्यांसाठी पाच ते दहा वर्षे तुरुंगवासाचीही तरतूद आहे. राज्यात दारूबंदी लागू केल्यानंतर आजवर नितीश कुमार हेच मुख्यमंत्रिपदी आहेत. कधी राष्ट्रीय जनता दल तर, कधी भारतीय जनता पक्षाशी युती करून त्यांनी मुख्यमंत्रिपद राखले आहे. त्यामुळे आपले हे महत्त्वाकांक्षी धोरण यशस्वी करण्याची जबाबदारी मुख्यत्वे त्यांचीच आहे. त्यासाठी त्यांना पुरेशी संधीही मिळाली. परंतु याविषयी सरकारकडून देण्यात येणारे आकडेच या धोरणाचे अपयशच दर्शवतात.

दारूबंदीनंतरच्या आठ वर्षांत बिहारमध्ये दोनशेहून अधिक जणांचा विषारी दारू पिऊन मृत्यू झाला आहे. हा सरकारी आकडा असल्याने खरा आकडा त्याहून अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कालावधीत ३.४६ कोटी लिटर मद्य जप्त करण्यात आले आहे. दारूबंदीचा कायदा या ना त्या कारणाने मोडल्याप्रकरणी ८.४३ लाख गुन्ह्यांची नोंद झाली आहे व १२.७ लाख जणांना अटक करण्यात आलेली आहे. अन्य राज्यांतून होणारी मद्यतस्करी ही तर नित्याचीच बाब झाली आहे. गेल्या आठवड्यात घडलेली घटना ही या धोरणासंदर्भातील आजवरची सर्वांत भीषण घटना आहे. सिवान व सारन या जिल्ह्यांत विषारी दारू प्यायल्याने ३५ जणांना प्राण गमवावे लागले, तर अनेकांची दृष्टी गेली. या जिल्ह्यांत काही ठिकाणी असलेल्या जत्रांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांमधून ही दारू विकली जात होती असे समजते. हा सगळा चोरीचा मामला असल्याने कारवाईच्या भीतीपोटी अनेकांनी चोरूनच वैद्यकीय उपचार करून घेणे पसंत केले. त्यामुळे बळींचा आकडाही खरा नसावा. यातील मृतांच्या वारसांना सरकारने २५ लाख रुपयांची मदत घोषित केली आहे, तर दृष्टी गमावलेल्यांना दहा लाख रुपये देण्यात येणार आहेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन नितीश यांनी दिले आहे. परंतु हे प्रकार रोखण्यासाठी कोणते ठोस उपाय करता येतील यावर सरकार विचार करताना दिसत नाही. या प्रकारानंतर अपेक्षेनुसार राजकीय आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत. सरकारने मद्यधोरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. दुसरीकडे, दारूबंदीच्या निर्णयाचा राज्यभरात नेमका काय परिणाम झाला, किती जणांनी दारू सोडली, या धोरणामुळे काय सामाजिक बदल झाले याचा धांडोळा घेण्यासाठी राज्य सरकारकडून आयआयएम रांचीमार्फत गेल्या वर्षीपासून सर्वेक्षण सुरू आहे. हे सर्वेक्षण आता अंतिम टप्प्यात आहे. परंतु यातून निघणारे निष्कर्ष हे कितपत वस्तुनिष्ठ असतील याविषयी साशंकताच आहे.

या दारूबंदीस आर्थिक विषमतेचीही किनार आहे. मद्यनिर्मितीस परवानगी नाही व मागणी मात्र आहे, अशी विचित्र स्थिती बिहारमध्ये आढळते. ज्यांना उंची, विदेशी मद्य परवडते ते मद्यप्रेमी काही करून आपली हौस भागवू शकतात. ज्यांना ते परवडत नाही असे अल्प उत्पन्न गटातील लोक मिळेल ती दारू जवळ करतात व त्यातूनच अशा दुर्घटना घडतात. बिहारचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी हे वादग्रस्त ठरतील अशी विधाने अधूनमधून करत असतात. सप्टेंबरमध्ये त्यांनी केलेल्या एका विधानाने सत्ताधाऱ्यांना चांगलेच अडचणीत आणले. 'आम्ही उच्चभ्रू हवं तेव्हा निश्चिंतपणे दारू पितो, पोलिस आम्हाला पकडत नाहीत. मात्र, दारूबंदीचा त्रास केवळ गरिबांना होतो. हा दुटप्पीपणा थांबायला पाहिजे,' असे ते म्हणाले होते. मांझी यांचे हे विधान पोलिटिकली करेक्ट नसले तरी याद्वारे बिहारमधील मद्यधोरणाचा मुखवटाच त्यांनी फाडला हे नाकारता येणार नाही.ज्या राज्यात दारूबंदी आहे, तेथेच विषारी दारूचे सेवन केल्यामुळे बळी जात असल्याचा विरोधाभास बिहारमध्ये वारंवार दिसतो. पोलिस यंत्रणा, उत्पादन शुल्क विभाग, प्रशासकीय अधिकारी यांच्यासह खुद्द मुख्यमंत्री या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढू इच्छितात का, हा प्रश्न अनुत्तरित आहे. आपले आदर्शवादी धोरण यशस्वी करायचे असेल तर दुर्दम्य इच्छाशक्ती हवी, मात्र नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये नेमका त्याचाच अभाव दिसतो. दारूबंदीची ही नशा दिवसेंदिवस अधिकाधिक घातक ठरत आहे.

# उड्डाणानंतर हवी नियोजनाची भरारी



गेल्याच आठवड्यात उलवे आणि पनवेल, नवी मुंबई, येथील नव्या विमानतळाच्या धावपट्टीचे प्रायोगिक तत्वावर, हवाई दलाच्या एका विमानाच्या आगमनाने उद्घाटन केले गेले. गेली कित्येक दशके मुंबईतील जुन्या सहार येथील गर्दीने वैतागलेल्या हवाई वाहतूक कंपन्यांना आणि प्रवाशांना यामुळे आशेचा किरण दिसू लागला. या भागाचे विधानसभेत प्रतिनिधित्व करणारे लोकप्रिय माजी आमदार दिवंगत दिनकर बाळू (दि. बा.) पाटील यांचे नाव प्रस्तावित असलेल्या या विमानतळ प्रकल्पाचे यानिमित्ताने अवलोकन करणे उचित ठरावे.

मुंबई व महामुंबईसाठी वापरात असलेल्या एकमेव व जुन्या सहार विमानतळाची क्षमता वेगाने वाढणाऱ्या विमानसेवेला पुरे पडणार नाही, हे ३० वर्षांपूर्वीच जाणवले होते. १९९७मध्येच मुंबईला पूरक ठरणाऱ्या विमानतळाच्या उभारणीसाठी १९९७मध्येच तत्त्वतः मान्यता दिली गेली होती. त्यानंतर 'आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संस्थे'ची संमती असलेल्या तज्ज्ञांची एक समिती नेमण्यात आली. मुंबईच्या तसेच सभोवतीच्या रहिवाशांच्या व उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्यासाठी, तेही सहारच्या वाहतुकीवर दुष्परिणाम होणार नाही, अशा जागी नव्या विमानतळाचे स्थान निश्चित करणे, हे ह्या समितीचे काम होते. समितीने आधी सहा निकषांची एक यादी तयार केली. त्यात आवश्यक तेवढ्या जमिनीची उपलब्धता, सहार आणि मुंबई शहरापासून योग्य ते अंतर, विमानांना लँडिंग आणि टेक ऑफसाठी लागणारे मार्ग आणि त्यातील अडथळे, पर्यावरण आणि अवास्तव खर्चापासून बचाव हे मुख्य निकष होते.

त्याशिवाय संरक्षण आणि गृह मंत्रालयाच्या गरजा यांचाही विचार करण्याची तरतूद त्यात होती. समितीने हे सर्व लक्षात घेऊन, उत्तरेस कल्याण आणि दक्षिणेस सिंधुदुर्ग यामधील सहा जागांचे परीक्षण केले. मग रेवस-मांडवा आणि पनवेल या जागा त्यातून निवडण्यात आल्या. रेवस-मांडवा येथील जागेस स्थानिकांकडून तसेच हवाई वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांकडूनही विरोध झाला. प्रदीर्घ परीक्षणानंतर पनवेल-उलवे ह्या जागेची शिफारस करण्यात आली. जुलै २००७च्या मुंबईच्या महाप्रलयाची आठवण ताजी होती, म्हणून पनवेल खाडी आणि निवडलेल्या जागेच्या जवळ असलेल्या लहान मोठ्या नद्यांच्या पुराचे काय परिणाम संभवतात, याविषयी पुण्याच्या सेंट्रल वॉटर आणि पॉवर संशोधन केंद्राकडून अहवाल मागविण्यात आला. पनवेलवर भरतीच्या आणि विमानतळावरून ओसरण्याऱ्या पाण्याचा काय परिणाम होईल, याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. विमानतळासाठी टाकण्यात येणाऱ्या भरावाची उंची पनवेलकडे जास्त आणि पनवेल खाडीकडे बरीच कमी ठेवण्याचे त्यातून ठरले. त्यानंतरच निवडलेल्या जागेची शिफारस राज्य सरकार, भारत सरकार व आयसीएओ (आयकाव किंवा आंतरराष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संस्था) यांच्याकडे करण्यात आली.

तरीही प्रकल्पाच्या विरोधात राजकीय दबाव मोठा होता. स्थानिक जनतेचा व पर्यावरणप्रेमींचा प्रकल्पास विरोध होता. न्यायालयात याचिका, नोटिसा यांचाही सामना त्यामुळे प्रकल्पाला करावा लागला. त्यात प्रकल्प प्रत्यक्ष सुरू होण्यात मात्र बराच वेळ गेला. या सर्व पार्श्वभूमीवर प्रकल्पाचा खर्च मूळ ९ हजार कोटींवरून २१ हजार कोटी रुपयांवर गेला आणि तो पूर्ण करण्याची तारीख अगणित वेळा पुढे ढकलण्यात आली. प्रकल्पाची निविदा त्या वेळच्या सहार विमानतळाची खासगी क्षेत्रातील कंपनीने जिंकली. परंतु प्रकल्प अर्ध्यावर असताना त्यांनी शरणागती पत्करली आणि प्रकल्पाची मालकी आणि व्यवस्थापन अदानी आणि त्यांचे परकीय भागीदार ह्यांच्याकडे आले. ह्या हस्तांतरात आणखी वेळ गेला.

कुठल्याही विमानतळावर धावपट्टी ही एक मूलभूत गरज आहे. नवी मुंबईच्या नव्या विमानतळावर दोन समांतर धावपट्ट्यांची सोय आहे. प्रकल्प एकूण चार टप्प्यांमध्ये विकसित केला जाणार आहे. त्यातल्या पहिल्या टप्प्याचा श्रीगणेशा गेल्या आठवड्यातील उड्डाणाने झाला. परंतु हवाई वाहतूकसेवा देणाऱ्या कंपन्यांना विमानतळाच्या २०२५च्या मार्चपर्यंत वाट बघावी लागेल, असा सध्याचा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करू पाहणाऱ्या विमानतळावर ज्या सर्व सोयी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे, त्यातल्या उरलेल्या काही सोयी येत्या काही महिन्यात उभारल्या जातील.

नव्या विमानतळावर ३७०० मीटर लांब आणि ६० मीटर रुंद अशा दोन समांतर धावपट्ट्या असतील. त्या एकमेकांपासून योग्य अंतरावर असल्यामुळे, दोन्ही धावपट्या एकाच वेळी वापरता येतील. सध्याच्या मुंबई विमानतळावर दोन धावपट्ट्या असल्या तरी त्या समांतर नव्हे, तर फुलीच्या आकाराच्या आणि कमी लांबी-रुंदीच्या आहेत. त्यामुळे नव्या विमानतळाची विमाने हाताळण्याची क्षमता सहारपेक्षा जास्त असेल. प्रवासी हाताळण्याची क्षमता, पहिल्या टप्प्यानंतर वर्षाला २ कोटी (सहारच्या एकूण क्षमतेच्या ४० टक्के) तर तिन्ही टप्पे झाल्यावर वर्षाला साडेपाच कोटी (सहारच्या दीडपट) असेल. तसेच मालवाहू क्षमताही सहारच्या दुप्पट असेल. साधारणतः खासगी वापरासाठी असलेली लहान विमाने तसेच हेलिकॉप्टर हाताळण्याची क्षमताही सहारच्या कितीतरी पटीने अधिक असेल. एकंदर तीन टर्मिनल्स प्रवाशांसाठी, आणखी एक टर्मिनल मालवाहू विमानासाठी आणि एक टर्मिनल खासगी विमानांसाठी असेल. मुंबई आणि नवी मुंबई येथील विमान वाहतुकीने एकमेकांना अडथळा न बनता, येण्या-जाण्यासाठी कुठले मार्ग स्वीकारावे हेही ठरवून झाले आहे. तसेच नव्या मुंबईच्या विमानांना विमानतळाच्या दक्षिणेला असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यावरून ठरावीक उंचीखालून उड्डाण करण्यास मज्जाव आहे. पर्यावरणास अनुकूल असा आणखी एक निर्णय म्हणजे खारफुटी संवर्धनासाठी उत्तरेकडचा बराच भाग सुरक्षित ठेवला गेला आहे.

या सर्व सकारात्मक गोष्टी असतानाच या नव्या विमानतळाच्या नियोजनात काही त्रुटी आहेत का? ह्या प्रश्नाचे उत्तर 'आहेत', असेच द्यावे लागेल. मुख्य त्रुटी दहशतवादी हल्ल्यांच्या प्रतिबंधात्मक सुरक्षेविषयी आहे. प्रवाशांना हाताळणारे टर्मिनल कुंपणापासून बरेच आत आहे. टर्मिनलपर्यंत नेणाऱ्या रस्त्याच्या (आणि बहुतेक नंतर बांधल्या जाणाऱ्या रेल्वेच्या दोन्ही बाजूला), विमानांचे पार्किंग आणि तोन टर्मिनल्सची सोय आहे. कुंपणाच्या रेषेत अडथळे आणि तपासणी पोस्ट ठेवले तरी ते धुडकावून, रॉकेट प्रोपेलड ग्रेनेडसारख्या अस्त्रांनी विमाने व टर्मिनलवर हल्ले करणे, कुटिल कारस्थाने करणाऱ्या दहशतवाद्यांना कठीण नाही. सध्या देशांतर्गत दहशतवादाचा निपटारा झाला आहे, असे मानून आपली पकड ढिली करणे धोक्याचे ठरेल. तिन्ही प्रवासी टर्मिनल पश्चिमी कुंपणाला लागून असती आणि विमाने कुंपणापासून दूर असती, तर सुरक्षा अधिक वाढली असती. विमानांना 'हाय व्हॅल्यू टार्गेट'च्या यादीत ठेवले जाते हे लक्षात ठेवावे. उद्दिष्टपूर्तीचा दबाव नसता, तर अशा आराखड्याला आम्ही एरव्ही मान्यता दिली नसती, असे एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने खासगी संभाषणात सांगितले.

ह्यानंतरच्या त्रुटींचे परीक्षण करताना कुंपणाला लागून असलेल्या वाहतूक सोयीचे अवलोकन करावे लागेल. ह्यासाठी विमानतळाच्या पूर्वेला असणारा आणि एक्सप्रेसवेला जोडणारा महामार्ग, दक्षिणेला असलेला पनवेल-उरण/ जे.एन,पी.टी. महामार्ग आणि रेल्वे, ह्यांचा अभ्यास करावा. जगात सर्वत्र तज्ज्ञांकडून 'इंटरमोडल कनेक्टिव्हिटी'ला खूप महत्त्व दिले जाते. म्हणजे, माल आणि प्रवासी ह्यांचे रेल्वेतून/रस्त्यावरून, विमानात आणि उलट बदल, सोपे करणे. विमानतळाच्या दक्षिणेलाच एक एसईझेडसुद्धा आहे. असे असताना मालवाहू विमानांचे पार्किंग उत्तरेला का, दक्षिणेच्या जवळ का नाही हे समजणे कठीण आहे.

कनेक्टिव्हिटीचे आणखी दोन मुद्दे म्हणजे, पनवेल खाडीचा उपयोग करून २० ते ४० प्रवाशांच्या हॉव्हरक्राफ्टने विमानतळाला गेटवे ऑफ इंडिया आणि ठाणे खाडीला लागून असलेल्या उपनगरांना जोडणे आणि पनवेल खाडी पार करून सीबीडी बेलापूरला जोडणे. याविषयीची योजना प्रस्तावित आहे की नाही, हे पुरेसे स्पष्ट नाही. सल्लागारांच्या प्रकल्प अहवालात याची शिफारस नक्कीच होती. तसेच उपनगरीय रेल्वे/मेट्रो प्रवाशांना विमानतळाच्या पश्चिमेस आम्रा हायवेवर सोडणार, की टर्मिनलच्या जवळ, हेही स्पष्ट नाही. टर्मिनलजवळ सोडण्याची शिफारसही प्रकल्प अहवालात होती. 'एरॉट्रोपोलिस' म्हणजे विमानतळाला केंद्रबिंदू ठरवून, भोवतालचा भौगोलिक भाग निर्यातप्रधान, पण पर्यावरणास प्रतिकूल नसणाऱ्या उद्योगांनी विकसित करणे, आणि त्या बाबतीचे धोरण लवकरात लवकर स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे.एव्हाना हे लक्षात आले असेल, की केवळ एक धावपट्टी आणि प्रवाशांच्या चढ-उतारासाठी एक इमारत बांधून समाधानाचा सुस्कारा सोडून चालत नाही. विमानतळ एक पांढरा हत्ती होऊ नये, तो अर्थव्यवस्थेचा आणि दळणवळणाचा एक महत्वाचा भाग व्हावा, यासाठी इतर अनेक पैलूंचा विचार करावा लागतो. तो तसा व्हायला हवा.

# समुद्राच्या पोटात चाललंय काय...

गडद निळा किंवा मोरपिशी रंगाचा लाटांचा पारदर्शक पडदा, त्यातून डोकावल्यास लालबुंद-जांभळे, हिरवे अशा रंगांचे तुडुतुडू धावणारे मासे, शेंदरी रंगाचे प्रवाळ, काटेरी झुडपे, एखाददुसरा तारामासा, शंख-शिंपले असे विलोभनीय दृश्य अंदमानच्या समुद्रात दिसते. स्कुबा डायव्हिंग किंवा समुद्राखाली पदभ्रमण केल्यास हे दृश्य डोळे दिपवून टाकते. समुद्राच्या पृष्ठभागाखाली ही अशी नवलाई असली, तरी काही गूढ हालचालीही तिथे सुरू असतात. त्या थेट आपल्या देशाच्या सुरक्षेला आव्हान देणाऱ्या असतात. या हालचाली किनारपट्टीपासून खूप दूरवर आणि खोलवर सुरू असतात. त्यांचा वेध घेण्यासाठी दृष्टी नव्हे, तर ध्वनी आणि श्रवण या दोन गोष्टी आवश्यक असतात. समुद्राच्या पोटात चाललंय काय, याचा अचूक आणि अव्याहत वेध घेत राहणे, हे आता सामरिक दृष्टीने नितांत गरजेचे ठरू लागले आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय संरक्षण दलांच्या व्यूहरचनेत गेल्या काही दिवसांत दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'आयएनएस अरिघात' या अण्वस्त्रे डागण्याची क्षमता असलेल्या व अणुइंधनावर चालणाऱ्या दुसऱ्या पाणबुडीचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात झालेला समावेश. ('आयएनएस अरिहंत' ही त्यातली पहिली). दुसरी घटना याच आठवड्यातली. ती म्हणजे तेलंगणमधील विकराबाद येथे दामगुडमच्या जंगलात तब्बल २९०० एकर क्षेत्रावर भारतीय नौदलाने एका अद्ययावत अतिदूरसंपर्कयंत्रणेच्या प्रणालीची पायाभरणी केली. ३२०० कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेले हे व्हीएलएफ म्हणजे व्हेरी लो फ्रिक्वेन्सी स्टेशन किंवा भूमीपासून कमी अंतरावरील अतिसूक्ष्म लहरींचे संपर्क केंद्र २०२७पर्यंत इथे उभे राहील. या केंद्रात संपर्कलहरींचे प्रसारण करण्यासाठी अनेक उंच मनोरे उभारले जातील. या मनोऱ्यांद्वारे हिंदी महासागरातच नव्हे, तर पृथ्वीच्या गोलाईवर कुठेही उभ्या असलेल्या नौका-हेलिकॉप्टर यांना सांकेतिक संदेशांचे प्रसारण करता येईल.

**भारतीय पाणबुड्यांना सांकेतिक संदेशवहन**

नौदलाच्या भात्यातील एक महत्त्वाचे छुपे अस्त्र म्हणजे पाणबुडी. ही पाणबुडी समुद्राच्या पृष्ठभागाखाली गेली की तिच्याशी इतर नौकांसारखा संवाद शक्य नसतो. किंबहुना, तो अनावश्यकच ठरतो. कारण पाणबुडीचा जर कुणाला ठावठिकाणा लागला, तर तिच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जातो. साहजिकच उपग्रहआधारित संवाद इथे शक्य नसतो. परंतु पाणबुडीला आपल्या नौदलाच्या कमांड-कंट्रोल कक्षाद्वारे काही महत्त्वाचे व्यूहरचनात्मक संदेश धाडणेही वेळोवेळी गरजेचे असते. मग अशा वेळी संपर्क कसा साधायचा? त्यासाठीच ही व्हीएलएफ यंत्रणा उपयुक्त ठरते. अत्यंत कमी उंचीपर्यंत म्हणजे ३ ते ३० किलोहर्टझ् इतक्या पातळीवर हे संदेश धाडले जाऊ शकतात. ही गरज भारताने यापूर्वीच ओळखली होती. त्यामुळे १९९०पासून तमीळनाडूतील तिरूनेलवेली येथे अशा प्रकारचे व्हीएलएफ केंद्र अस्तित्वात आले. मात्र आता पाणबुड्यांच्या जगतात झालेले तंत्रबदल व हिंदी महासागरातील आव्हानांमुळे भारताच्या टेहळणीच्या कक्षा रुंदावल्या. त्यामुळे अधिक प्रगत केंद्राची आवश्यकता निर्माण झाली.

**पाणबुड्या संदेश कसा मिळवतील ?**

भारताकडे असलेल्या पारंपरिक डिझेल-इलेक्ट्रिक श्रेणीतील पाणबुड्यांना साधारण ४८ तासांनी तरी बॅटरी चार्ज करण्यासाठी समुद्रातून डोके वर काढावे लागते. मात्र आता नव्याने दाखल झालेल्या अणुभट्टीवर चालणाऱ्या पाणबुड्या महिनोन् महिने समुद्राखाली राहू शकतात. अशा पाणबुड्या संपर्कग्रहणासाठी त्यांचा एक अॅन्टेना त्यांच्या गरजेनुसार समुद्रपृष्ठावर काढतील आणि ज्यावेळी अॅन्टेना वर डोकावेल, तेव्हा त्यास व्हीएलएफ रेडिओलहरींचा संदेश ग्रहण करता येईल. हा सांकेतिक संदेश उलगडण्याचे (डिकोडिंगचे) काम तंत्रज्ञ करतील. त्यानुसार पाणबुडीचा कप्तान पुढील मार्गक्रमणा किंवा एखादी कृती ठरवू शकेल. यात पाणबुडी मात्र शक्यतोवर इतरांशी बोलणार नाही. कारण तसे झाल्यास तिचा ठावठिकाणा समजून येईल.

**अणुपाणबुड्या व संदेशवहन**

भारतीय नौदलाच्या ताफ्यात आयएनएस अरिहंत ही सुमारे साडेसातशे किलोमीटर पल्ल्यापर्यंतचा लक्ष्यवेध घेऊ शकणारी पहिली पाणबुडी प्रथम दाखल झाली. आता 'आयएनएस अरिघात'वरील के ४ या क्षेपणास्त्राचा पल्ला साडेतीन हजार किलोमीटर इतका आहे. याच एसएसबीएन श्रेणीमध्ये 'आयएनएस अरिधमन' ही आणखी एक पाणबुडी दाखल करण्याचे प्रस्तावित आहे. तर एसएसएन म्हणजे केवळ अणुइंधनावर चालणाऱ्या (अण्वस्त्रधारी नव्हे) दोन पाणबुड्याही ताफ्यात घेण्याची भारताची योजना आहे. अण्वस्त्रांचा प्रथम वापर भारत करणार नाही, हे धोरण आहे. मात्र अन्य कोणत्या राष्ट्राने तो केलाच, तर आपल्या भूमीपासून दूरवरून प्रतिहल्ला करता यावा, हे या अण्वस्त्रधारी क्षमता असलेल्या पाणबुड्यांचे उद्दिष्ट आहे. अणुइंधनामुळे पाणबुडीची पाण्याखाली राहण्याची क्षमता कमालीची वाढते. मात्र इतका प्रदीर्घ काळ मूळ व्यूहरचनाकारांपासून विलग राहणेही परवडणारे नसते. त्यासाठीच हे संदेशवहन आवश्यक ठरते. बाकी पाणबुडीत एखादी दुर्घटना झाल्यास त्यातील नौसैनिकांना वाचविण्यासाठी पाण्याखालील बचावाचे एक वाहनही आता नौदलाने ताफ्यात सज्ज ठेवले आहे.

**समुद्राच्या पोटातील आव्हाने**

समुद्री क्षेत्रात प्रतिस्पर्ध्याला अचानक चकित करून गारद करण्यात किंवा विशिष्ट क्षेत्रात शिरकाव करण्यापासून रोखण्यात पाणबुडीचे स्थान आजवर अनन्यसाधारण राहिले आहे. हिंदी महासागराच्या विस्तीर्ण क्षेत्रात चीनने त्यांच्या पाणबुड्यांचा संचार वाढवला आहे. त्या अरबी समुद्रापर्यंत येऊ लागल्या आहेत. या संचाराला अटकाव करायचा, तर आपल्याला समुद्राच्या पृष्ठाखाली काय चालले आहे, त्याचे सातत्याने आकलन करून घ्यावे लागते. २६ नोव्हेंबर २००८च्या हल्ल्यानंतर समुद्री क्षेत्र आकलन (मॅरिटिम डोमेन अवेअरनेस) या विषयावर भारताने बरेच लक्ष केंद्रित केले. त्यादृष्टीने आवश्यक त्या सामग्रीची भर घातली. मात्र त्यापुढचे एक पाऊल म्हणजे समुद्राखालील क्षेत्राचे आकलन (अंडरवॉटर डोमेन अवेअरनेस). ही संज्ञा आता जोर धरू लागली असून खासकरून हिंदी महासागराच्या बाबतीत व हिंद-प्रशांत क्षेत्रातील आव्हानांच्या बाबतीत तिचा संदर्भ अधिक घेतला जातो.

**समुद्राखालील सेन्सर्सचे स्थान महत्त्वाचे**

समुद्री क्षेत्रात अनोळखी व संशयित जहाजांचा धोका वाढत असून तो केवळ समुद्रपृष्ठालगत मर्यादित राहिलेला नाही, तर समुद्रपृष्ठाखालीही अशा 'ब्लॅक शिप्स'चा धोका आहे, त्यासाठीच समुद्राच्या पोटातील हालचाली टिपण्याच्या तंत्रात पारंगत होणे गरजेचे ठरते, असा मुद्दा संरक्षणतज्ज्ञ व भारताच्या अंटार्क्टिका मोहिमेत प्रतिनिधित्त्व केलेले नौदल अधिकारी निवृत्त कॅप्टन सरबजित परमार अधोरेखित करतात. ते म्हणतात, व्हीटीएमएससारख्या यंत्रणांद्वारे समुद्रात संचार करणाऱ्या जहाजांची ओळख पटविली जाते. जलवाहतुकीतील संशयास्पद संचारावर आपली पाळत असतेच. त्यासाठीच गुरगाव येथे हिंदी महासागरासाठीचे इन्फर्मेशन फ्युजन सेन्टर कार्यान्वित करण्यात आले आहे. या टेहळणीतही सर्वात छोट्या नौकांची ओळख पटविणे आव्हानच असते. मात्र त्याहीपेक्षा मोठे आव्हान म्हणजे समुद्रपृष्ठाखालील हालचालींचा वेध घेणे. त्यासाठीच समुद्राखाली हालचाली टिपणारे सेन्सर्स बसविणे आवश्यक ठरते. हे अत्यंत खर्चिक काम असते. समुद्रातील क्षारांचे प्रमाण व अन्य नैसर्गिक प्रतिकूलता यावरही या टेहळणीयंत्रांची परिणामकारकता ठरते. खोल समुद्र हा चहूबाजूंनी अफाट पसरलेला असतो. तिथे नेमके कुठे हे सेन्सर्स बसवायचे, हे अचूक ठरवावे लागते. जिथे शत्रूच्या पाणबुड्या किंवा संशयास्पद हालचालींची शक्यता अधिक आहे, जिथे आपल्या देशाच्या हिताला बाधा पोहोचू शकते, अशा नेमक्या ठिकाणी हे सेन्सर्स बसवावे लागतात. अर्थात केवळ सेन्सर्सवर आपली भिस्त ठेवून चालत नाही. त्यासाठीच परस्पर मित्रराष्ट्रांमधील गोपनीय माहितीचे आदानप्रदान यावर भर द्यावा लागतो. दोन राष्ट्रांमध्ये करारमदार झाल्याखेरीज इतर राष्ट्राच्या हद्दीत किंवा हितसंबंधी क्षेत्रात आपल्याला पाळत ठेवणेही शक्य नसते. या सर्वांचा समुद्राखालील क्षेत्राचे आकलन वाढविताना विचार करावा लागतो.

## हिवाळी अधिवेशनात २० विधेयके मांडण्यात येणार

# महाराष्ट्रात आजपासून गतिशील कारभार सुरू–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर (वृत्तसंस्था)**

राज्य मंत्रिमंडळाचा आज विस्तार करण्यात आला असून यामध्ये एकूण ३९ मंत्र्यांनी शपथ घेतलेली आहे. महाराष्ट्रात आजपासून गतिशील कारभार सुरू झाला आहे. हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षाने विविध संसदीय आयुधांचा वापर करून उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर चर्चा करून राज्याच्या व जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. हिवाळी अधिवेशनात एकूण २० विधेयके मांडण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रामगिरी या शासकीय निवासस्थानी आयोजित मंत्रिपरिषद बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, हिवाळी अधिवेशन आहे आणि थंडी देखील आहे. त्यामुळे या अधिवेशनामध्ये आम्ही महाराष्ट्राच्या जनतेला ऊब मिळेल आणि ऊर्जा मिळेल, अशा प्रकारचा कारभार करण्याचा प्रयत्न निश्चितपणे करू. महाराष्ट्रामध्ये सामान्य माणसाला आणि विशेषतः विदर्भात अधिवेशन चालू असल्यामुळे विदर्भाच्या जनतेला देखील दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या अधिवेशनामध्ये राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा, पुरवणी मागण्यांवर चर्चा, सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा असे कामकाज होणार असून त्यासोबत जवळपास वीस विधयेके मांडण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीने महाराष्ट्राकरिता मतदान केले आहे, म्हणून आमचे सरकार हे 'ईव्हीएम' सरकार आहे, पण त्या ईव्हीएमचा अर्थ 'एव्हरी वोट फॉर मॅग्नेटिक महाराष्ट्र' असा आहे. आम्ही मॅग्नेटिक महाराष्ट्र घडविण्याकरिता या पुढच्या काळामध्ये निश्चितपणे कामकाज करणार आहोत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. सोयाबीनच्या खरेदीमध्ये यावर्षी आपण गेल्या पंधरा वर्षाचे रेकॉर्ड तोडले आहे. यंदाही मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू आहे. मागच्या वर्षी सोयाबीन आणि कापसासाठी भावांतर योजना राबवून बाजारभाव व हमीभाव यातील फरकाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली. तसेच धानाच्या शेतकऱ्याला हेक्टरी २० हजार रुपये दिले. हे शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ताकदीने उभं राहणारे शासन आहे, असेही त्यांनी सांगितले.

परभणीमधील घटना ही एका मनोरुग्णामुळे घडली असून मनोरुग्णाच्या कृत्यावर कोणतेही असंविधानिक उद्रेक करणे योग्य नाही. हे शासन संविधानाचा सर्वोच्च सन्मान करणारे आहे. संविधानाच्या बाहेर तसूभरही वेगळे काम करणार नाही. आमचे सरकार संविधानाचा गौरव करणारे आहे. बीड जिल्ह्यातील घटनेची विशेष एसआयटीमार्फत चौकशी करण्यात येणार असून आरोपी कोणीही असले तरी त्यांना सोडले जाणार नाही. अशा घटना महाराष्ट्रात गांभीर्यानेच घेतल्या जातात व यापुढेही घेतल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

'मिशन समृद्ध महाराष्ट्र'साठी काम करणार – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आम्ही गेली अडीच वर्षे टीम म्हणून काम केले आहे. आता आमची जबाबदारी वाढलेली आहे. जनतेच्या प्रति आम्ही उत्तरदायी आहोत. 'मिशन समृद्ध महाराष्ट्र' हे उद्दिष्ट ठेवून काम करणार आहोत. शेतकऱ्यांच्या, जनतेच्या हिताचे प्रकल्प सुरू करून त्यांना चालना दिली. एकीकडे विकास आणि दुसरीकडे लोककल्याणकारी योजना यांची सांगड घातली. लोकाभिमुख आणि गतिमान शासन आणून यापुढेही गतिमानतेने निर्णय घेऊ. या पुढील काळात सर्वसामान्य जनतेसाठी व राज्याच्या विकासासाठी काम करणार आहोत. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर करण्यास महाराष्ट्र शासन हातभार लावणार आहे.

जनतेच्या विश्वासाला पात्र राहून सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणार – अजित पवार

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, जनतेने जो विश्वास आमच्यावर टाकला आहे, त्याला पात्र राहून महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी आम्ही सगळेजण प्रयत्न करणार आहोत. महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे प्रश्न चर्चेला आले तर त्यावर निश्चितपणे उत्तर दिले जाईल. विरोधकांचा योग्य सन्मान ठेवला जाईल.

मंत्रीमंडळ बैठकीपूर्वी झालेल्या चहापान कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह नवनियुक्त मंत्री, विधीमंडळ सदस्य उपस्थित होते.

हिवाळी अधिवेशनात मांडण्यात येणार २० विधेयके



राज्य विधानमंडळाच्या सन २०२४ च्या चौथ्या अधिवेशनात १४ अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवून त्याचे विधेयकामध्ये रुपांतर करण्यात येणार आहे. तसेच ६ नवीन विधेयके मांडण्यात येणार आहेत. एकूण २० विधेयकांवर विचार करण्यात येणार आहे.

**विधेयकात रूपांतरित होणारे अध्यादेश**

(१) सन २०२४ चे वि.स.वि.क्र... महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ (नगर विकास विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. ५ चे रुपांतरीत विधेयक) अप्रत्यक्षपणे निवडलेल्या नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा पदावधी पाच वर्षे करणे,

(२) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ (सामान्य प्रशासन विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. ६ चे रुपांतरीत विधेयक) (सर्वसाधारण बदलीसाठीच्या कालावधी ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्याची तरतूद)

(३) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा, विधेयक, २०२४. (महसूल व वन विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. ७ चे रुपांतरीत विधेयक) (दंडाच्या कमाल मर्यादेत वाढ)

(४) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रदद् करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. ८ चे रुपांतरीत विधेयक) (अनधिकृत हस्तांतरण नियमित करणेबाबत)

(५) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (वित्त विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. ९ चे रुपांतरीत विधेयक) (केंद्रीय अधिनियमाच्या अनुषंगाने सुसंगत सुधारणा करणे)

(६) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. ... महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १० चे रुपांतरीत विधेयक) (अपराधांच्या शिक्षेत वाढ अधिनियमाच्या तरतुदीच्या उल्लंघनाबद्दल कडक शिक्षा व दंड वाढविण्याबाबत)

(७) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या निवडणुका तात्पुरत्या ढकलणे विधेयक, २०२४ (ग्रामविकास विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. ११ चे रुपांतरीत वि (जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांच्या सभापती इत्यादी पदांच्या निवडणूका पुढे ढकलणे

(८) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वनविभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १२ चे रुपांतरीत विधेयक) (शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने अनुसूची एकच्या अनुच्छेदामध्ये सुधारणा करणेबाबत)

(९) सन २०२४ चे वि.प.वि.क्र... महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १३ चे रुपांतरीत विधेयक) (वाचन संस्कृतीचा व ग्रंथालय चळवळीचा विकास करण्यासाठी अधिनियमाच्या विवक्षीत कलमांमध्ये सुधारणा करणेबाबत)

(१०) सन २०२४ चे वि.स.वि.क्र... महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १४ चे रुपांतरीत विधेयक) (जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजनाचे नियमाधीकरण करण्यास परवानगी देणे आणि नियमाधीकरण अधिमुल्य कमी करुन बाजारमुल्याच्या ५ टक्के इतके निश्चित करणे)

(११) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. .. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी,

(सुधारणा) विधेयक, २०२४ (विधि व न्याय विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १५ चे रुपांतरीत विधेयक) (विश्वस्थ समितीचा कार्यकाळ आणि समिती सदस्यांची संख्या वाढविणे)

(१२) सन २०२४ चे वि.प.वि.क्र... महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १६ चे रुपांतरीत विधेयक) (समुह विद्यापीठ घटित करणेच्या तरतुदीमध्ये सुधारणा)

(१३) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ दुसरी सुधारणा, विधेयक, २०२४( उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १७ चे रुपांतरीत विधेयक) (नविन महाविद्यालय उघडण्यासाठी इरादापत्र मागविण्यासाठी कालावधी वाढवून देणेबाबत)

(१४) सन २०२४ चे वि.प.वि.क्र. .. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ दुसरी सुधारणा, विधेयक, २०२४ (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग) (सन २०२४ महा. अध्या. क्र. १८ चे रुपांतरीत विधेयक)

**प्रस्तावित विधेयके**

(१) सन २०२४ चे वि.प.वि.क्र... महाराष्ट्र खाजगी विद्यापीठं दुसरी सुधारणा, विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

(२) सन २०२४ चे वि.स.वि.क्र... महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विधेयक, २०२४ (गृह विभाग)

(३) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. (महसूल विभाग) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२४

(४) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल विभाग)

(५) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. विधेयक, २०२४ (महसूल विभाग) महाराष्ट्र शेतजमीन (जमिन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा)

(६) सन २०२४ चे वि.स.वि.क्र. महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ (वित्त विभाग)

# अवकाळीचा ९ हजार शेतकऱ्यांना दणका आठ महिन्यात ३ हजार ८९७ क्षेत्रावर नुकसान

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात यंदा एप्रिल महिन्यांपासून ते नोव्हेंबर या आठ महिन्याच्या काळात ८हजार ९२६ शेतकर्यांच्या ३हजार ८९७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झालेले आहे.

जिल्ह्यात चालूवर्षी अनेक ठिकाणी पावसाने दमदार ते अतिवृष्टी अशा पावसाने हजेरी लावली. विशेष करून जिल्ह्याच्या दक्षिण भागात त्याचे प्रमाण सर्वाधिक होते. यंदा एप्रिल महिन्यांच्या १८ तारखेपासून जिल्ह्यात सुरूवात झाली. या पावसामुळे नगर तालुक्यात, त्यानंतर मे महिन्यांच्या ६ आणि ७ तारखेला, तसेच २७, २८, २९ आणि ३१ तारखेला पाथर्डी, कर्जत, जामखेड, शेवगाव, कर्जत या तालुक्यात अवकाळी, वादळी वारे यामुळे पिकांचे नुकसान झाले. जून महिन्यांच्या ५,६,७आणि १६ तारखेला जामखेड आणि नेवासा तालुक्यात, त्यानंतर जुलैच्या २ आणि ४ तारखेला अकाले, शेवगाव, नेवासा, शेवगाव, कर्जत, नगर तालुक्यात वादळी वारे, ५आणि २६ ऑगस्टला जामखेड आणि संगमनेर तालुक्यात अतिवृष्टी व पूर, ९ ऑगस्टला अकोले तालुक्यात सततचा पाऊस, ६,९सप्टेंबरला अतिवृष्टी, पूर आणि सततच्या पावसामुळे श्रीगोंदा, अकोला, संगमनेर तालुक्यात ९, १०,११, १४, १७ ऑक्टोबरला अकोले, कोपरगाव, श्रीगोंदा, नगर, तसेच ४, ५, ७, ११ नाव्हेंबरला राहुरी, श्रीरामपूर, जामखेड, कर्जत याठिकाणी अवेळी पाऊस, ओढे, नाल्यातील पूराचे पाणी शेतात घुसल्याने शेतकर्यांचे नुकसान झालेले आहे.

याबाबतचे पंचनामे कृषी आणि महसूल विभागाने संयुक्तपणे केलेले असून भरपाईचा अहवाल शासनाला पाठवण्यात आला आहे. राज्य



सरकारच्यावतीने नुकसान भरपाई देतांना बाधित क्षेत्र २ हेक्टर मर्यादित व २ हेक्टरपेक्षा वाढीव क्षेत्रनूसार पंचानामे करण्यात येण्यात येतात. यात देखील ३३ टक्क्यांपेक्षा कमी आणि ३३ पेक्षा अधिक असणारे शेतकरी असे वर्गी करण्यात येवून जिरायत, बागायत क्षेत्रानूसार भरपाई देण्याची तरतूद आहे.

जिल्ह्यात सुमारे ९ हजार शेतकर्यांचे ३ हजार ८९७ हेक्टरवरील पिकांचे ४ कोटी ७७ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. तसेच भरपाईसाठीचा अहवाल तयार करून महसूल, कृषी आणि जिल्हा परिषदेच्या अधिकार्यांच्या संयुक्त सहीने सरकारला सादर करण्यात आला आहे. या अहवालानूसार राज्य सरकारकडून भरपाई मंजूर करून ती संबंधित शेतकर्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

# राहुरीत १९ डिसेंबरला नरेंद्राचार्याजी महाराज यांचे पादुका दर्शन सोहळा

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी :राहुरी शहरातील नगर- मनमाड मार्गालगत असलेल्या हिरोहोंडा शोरूम पाठीमागील भव्य पटांगणात दक्षिण पीठ नाणीजधामचे मठाधिपती जगतगुरु रामानंदाचार्य श्री. स्वामी नरेंद्राचार्याजी महाराज यांचे पादुका दर्शन व प्रवचन सोहळा गुरुवार दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने आज याठिकाणी ध्वजारोहण संपन्न झाले.

जगतगुरू स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या सिद्ध पादुका दर्शन व प्रवचन सोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील स्व स्वरूप संप्रदाय परिवाराकडून जय्यत तयारी सुरु असून यानिमित्ताने नानिजधाम संस्थानच्या वतीने सामाजिक उपक्रम, उपासक दीक्षा व अध्यात्मिक प्रवचन आदी विविध धार्मिक कार्यक मांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भव्य-दिव्य मंडप उभारण्यात येत असून ठिकठिकाणी सोहळ्याचे बॅनर लावण्यात आले आहेत. जिल्ह्यात लाऊड स्पीकर व भाविकांच्यावतीने प्रचार-प्रसार करण्यात आला आहे.या प्रवचन सोहळ्यानिमित्त विधिवत पूजन होऊन ध्वजारोहण संपन्न झाले.



# नेवासा फाटा येथील वाहतूक कोंडीला अतिक्रमणच जबाबदार

**नेवासा । प्रतिनिधी**

अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नेवासा फाटा येथील आंबेडकर चौक आणि राजमुद्रा चौकात सततच वाहतुकीचा बोजवारा उडालेला आहे. वारंवार वाहतूक कोंडी होत असल्यामुळे वाहनधारकांसह व्यापाऱ्यांना या वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास सहन करण्याची वेळ आलेली आहे.

ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दिवसभर वाहतूक पोलिसांचे मोठे हाल होत असून, या कोंडीतून रुग्णवाहिका आणि पोलिसांचे वाहनेही सुटले जात नाहीत. याचे मुख्य कारण महामार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण कारणीभूत असताना याकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. येथे दिवसभर वाहतूक कोंडी आणि या कोंडीतून वाहनाच्या हॉर्नचा कर्णकर्कश आवाजामुळे व्यापाऱ्यांची डोकेदु:खी होत आहे. याकोंडीतून सुटका करण्यासाठी नेवासा फाटा येथील अतिक्रमण काढण्याची नितांत गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांनीच याकडे आता लक्ष घालण्याची मागणी जनतेतून केली जात आहे.

नेवासा फाटा येथे महामार्गाच्या रस्त्याच्या दुतर्फा मोठे अतिक्रमण करण्यात आलेले असल्यामुळे ही वाहतूक





कोंडीची समस्या वारंवार होत आहे. वाहतूक शाखेचे पोलीस दिवसभर वाहतूक नियंत्रण करताना दिसून येत असले तरी एका चौकातील कोंडी सुटली की, दुसऱ्या चौकात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे यामध्ये प्रवाशांचे मोठे हाल होत आहे. जागतिक बँक प्रकल्प विभागाने याची दखल घेऊन वाहतूक कोंडीचा कायमस्वरुपी प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण काढून टाकण्याची गरज आहे

# रामदास आठवले यांचा घटनास्थळी दौरा गुप्तचर विभागाकडून चौकशीची मागणी

**परभणी । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळील संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेच्या निषेधार्थ केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी शनिवारी (दि. १४) परभणीला भेट देत संपूर्ण घटनेची गुप्तचर विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली.

संविधानाचा अवमान करणाऱ्या कोणालाही भारतात राहण्याचा अधिकार नाही, असे ठाम मत व्यक्त करत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवलेल्या संविधानाच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट केले.परभणी दौऱ्यात आठवले यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, प्रभारी पोलीस अधीक्षक यशवंत काळे व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत शासकीय विश्रामगृहावर बैठक घेतली. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी आरोपी सोपान पवार याच्या मागील कारणांची व घटनेत इतर कोणी सहभागी आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले. आठवले यांनी आरोपीवर ऍट्रॉसिटीसह गंभीर गुन्हे दाखल असल्याचे सांगितले. त्याच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तेथे सुटका झाल्यानंतर गुप्तचर विभागाकडून चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. या प्रकरणातील जबर मारहाणीच्या तक्रारींचीही चौकशी करून संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या घटनेत आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पोलिसांनी ३०० जणांवर गुन्हे दाखल केले असून ४२ जणांना अटक केली आहे. यातील १० जणांना जामीन मिळाला आहे. निरपराध विद्यार्थ्यांना यातून सुटका देण्याचे आवाहन करत, दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्याचे आश्वासन आठवले यांनी दिले. परभणीतील तणावपूर्ण परिस्थितीत प्रशासन सतर्क असून पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.



# अंबाजोगाई शहरानजीक बनावट दारूचा कारखाना, ३६ लाख रूपयांचा ऐवज जप्त राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाची कारवाई

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने अंबाजोगाई शहरातील बुट्टेनाथ दरी मध्ये असलेल्या बनावट दारू च्या कारखान्यावर धाड टाकून ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केल्या मुळे खळबळ उडाली आहे

मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. विश्वजीत ए. देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १६.१२.२०२४ रोजी गुप्त माहितीच्या आधारे मौजे बुट्टेनाथ दरी येथे काटवन झाडीत असलेल्या गोडावून शेडमध्ये ता. अंबाजोगाई जि. बीड येथे कार्यालय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र. ०२ बीड, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अंबाजोगाई, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क माजलगाव, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क बीड यांच्या पथकाने कारवाई करत छापा टाकला असता सदरील गोडावून पत्री शेडमध्ये खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला.



या मध्ये १) बनावट देशी दारु रॉकेट मद्याच्या १०५०० बॉटल (१०५ बॉक्स) त्याची अं.कि. रु. ३६७५००/- २) एक जेएसएल जिंदाल स्टेनलेस कंपनीचे स्वयंचलित सिलींग, फिलींग व बॉटलींग मशीन अं.किं. रु. १५००००/-३) २०० लि. मापाचे स्पीरीटने भरलेले प्लास्टीक बॅरल अं. किं. रु. २५०००/- ४) २०० लि. मापाचे १२ रिकामे प्लास्टीक बॅरल अं. किं. रु. ६०००/-५) ९० मिली क्षमतेच्या १००८०० प्लास्टीकच्या रिकाम्या बाटल्या अं. किं. रु. १००८००/- ६) देशी दारु रॉकेटचे ३०००० बुचे अं. किं. रु. ३००००/- ७) देशी दारु रॉकेटचे ८००० लेबल अं.किं. रु. १६०००/-८) २००० लि. व ५०० लि. चे एकुण ३ पाण्याचे बरॅल अं.किं. रु. ९०००/- ९) पाण्याची मोटार २ नगर अं. किं. रु. १००००/-१०) प्रवरा प्रिंट चे ६० टेप रोल अं.किं. रु. ३०००/- ११) देशी दारु रॉकेट बॉक्स चे पुढे १००० नग अं. किं. रु. २०००/- १२) ५ अल्कोहोल मीटर अं. किं. रु. २५००/-१३) विविध कंपनीचे ४ भ्रमणध्वनी अं. किं. रु. ७५०००/-१५) एक किया कंपनीचे सेलटॉस चारचाकी कार जिचा नोंदणी क्रं. एमएच-१२ आरवाय- ४४०६ अं.किं. रु. १००००००/- १६) एक अशोक लेलँड कंपनीचे आयशर टेम्पो ज्याचा नोंदणी क्र. एमएच-४० सीडी ३४२१ अं.किं. रु. १७०००००/-१७) १० लिटर क्षमतेचे इसेंस ने भरलेले प्लास्टीक कॅन अं.किं. रु. ७५००/- १८) पाण्याचे प्लास्टीकचे पाईप - ५ नग अं.किं. रु. २५००/-१९) एक आर.ओ. पाणी फिल्टर मशीन अं. किं. रु. ५०,०००/- असा एकुण रू. ३५,५६,८००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या गुन्ह्यातील आरोपी १) आकाश गोवर्धन नेहरकर (वय २९ वर्षे), रा. गांधीनगर, अंबाजोगाई जि. बीड आणि धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथील पाच अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. तर, पप्पू कदम व दिनेश गायकवाड हे फरार झाले असुन त्याचा शोध सुरु आहे. या आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई ही विश्वजीत ए. देशमुख (अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली डी.डी. चौरे (निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड), आर. बी. राठोड, (निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड), डी. आर. ठोकळ दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अंबाजोगाई, ए.एल. कारभारी, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भ.प. क्रं. ०२ बीड, तसेच आर.बी. कदम स.दु.नि., जवान- एस.व्ही. धस, आर.ए. जारवाल, बी. के. पाटील, आर. एम. गोणारे, के.एन. डुकरे, एस. व्ही. लोमटे, डी. एस. वायभट, ए.पी. कदम, श्रीमती एस.एस. ढवळे, आर.जी. मुंडे, एस. एस. ढोले यांनी सदरील कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड हे करीत आहेत

### सोमनाथ सूर्यवंशी यांच्या पोलीस कस्टडी मृत्यूच्या निषेधार्थ

## महाराष्ट्र बंद गंगापूर शहरा मध्ये शंभर टक्के यशस्वी

**छ. संभाजीनगर ।प्रा संजय तुपे**

परभणी येथे झालेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ संविधान प्रतिकृतीच्या विटंबना प्रकरणी परभणी येथील भीम सैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडी मृत्यू प्रकरणी आंबेडकरी चळवळीतील गंगापूर येथील सर्व संघटना व समाजाच्या वतीने दिनांक १६/ १२/२०२४ रोजी महाराष्ट्र बंद यामध्ये गंगापूर शहराने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बंद १००% यशस्वी केला. सर्व आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते यांनी महाराष्ट्र बंद पुकारला त्याला गंगापूर शहरातील आंबेडकरी समाजाच्या वतीने गंगापूर शहर बंदचे आव्हान करण्यात आले होते.या बंद मध्ये शहरातील सर्व व्यापारी वर्गाने सहकार्य करून बंद शंभर टक्के यशस्वी केला. व्यापारी वर्गांनी प्रतिसाद दिल्यामुळे बंद शांततेत पाळण्यात आला. यावेळी गंगापूर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.या निवेदनात म्हटले आहे की परभणी येथील घटनेत पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहाणीने शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी हा



आंबेडकरी तरुण संविधानाच्या रक्षणार्थ पोलिसाच्या कस्टडीमध्ये शहीद झाला आहे. सोमनाथचा मृत्यू संशयास्पद असून त्याची संपूर्ण चौकशी करून पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत,तसेच आंदोलनकर्त्या वरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत, अटके तील सर्व आंदोलनकर्त्यांची सुटका करावी व अमानुष अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी. शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करावे. अशा मागणीचे निवेदन शहरातील भीमसैनिकांच्या वतीने शहरांमध्ये मोटरसायकल रॅली काढून सर्व व्यापारी वर्ग व सर्व शहरातील रहिवाशांना बंदचे आवाहन करून गंगापूर तहसील यांना निवेदन देण्यात आले. या बंदमध्ये संघटना ,पक्ष विरहित सर्व भीम कार्यकर्ते पदाधिकारी यांनी या बंदमध्ये सहभाग नोंदवला. भीमसैनिक बाबा भिवसाने, जितेंद्र शिरसाट, संदिप खाजेकर,आनंद भिवसने, बापू खाजेकर, राहुल खाजेकर, राहुल वानखेडे, वैभव खाजेकर,किरण निकम, दीपक जगताप, राहुल सोनवणे, सागर खाजेकर, गौतम कोळसे, सागर गोरख खाजेकर, सिद्धार्थ खाजेकर, पोपट खरात, योगेश पाखरे, सुमित शिरसाट, दयानंद खाजेकर,पवन खाजेकर,बाळू खाजेकर,अबू चाऊस, अमोल साळवे, सर्व भीमसैनिक व भीम अनुयायी हे मोठ्या संख्येने सहभागी होते

## सोमनाथ सुर्यवंशी यांच्या पोलिस कोठडीतील मृत्यु प्रकरणी लोहा शहर कडकडीत बंद

**लोहा । प्रतिनिधी**

महामानव,क्रांतीसुर्य,भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू,रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली परभणीतील झालेल्या भारतीय संविधानाच्या विटंबनेच्या निषेधार्थ परभणी शहर बंद करण्यात आले होते.व या परभणी शहर बंद आंदोलनातील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांना पोलिसांनी बेदम मारहाण करुनअटक करुन पोलिस कोठडी मध्ये टाकले आणी भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिस कोठडीत मृत्यु झाल्या प्रकरणी रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली.म्हणुन रिपब्लिकन सेनेच्या वतीने व विविध आंबेडकरी संघटनेच्या वतीने खालील मुख्य मागण्या घेऊन लोहा शहरातील व्यापारपेठ कडकडीत बंद करण्यात आली.निवेदनातील मागण्या १) पोलिसांच्या कोंबिंग ऑपरेशनची आण एकुण सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी.२) कलम१७६(१-)उठझउ अन्वये या प्रकरणाची चौकशी करावी.३) न्यायालयीन चौकशी ही सेवानिवृत्त न्यायाधिशांकडुन न करता सिटींग न्यायाधिशा मार्फत करावी.४)पोलिस निरिक्षक अशोक घोरबांड सह ईतर पोलिस अधिका-



यांवर कलम ३२अन्वये ॲट्रासिटी कायद्यान्वये कलम ३(१), आणी ३(२)प्रमाणे गुन्हे दाखल करावे.सोबतच मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.५)परभणी शहरातील सर्व पोलिस स्टेशन मंदिर तातडीने उउढत जप्त करुन ते उउढत तपासावे.६)शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना सरकारने तातडीने रु.५० लाखांची अर्थीक मदत करावी.७) शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस तातडीनेशासकीय नौकरीत घेऊन त्यांचे पुनर्वसन करावे.८)वच्छलाबाई मानवते या महीलेला मारहाण करणा-या ओलिसांवर तातडीने कलम३५४,३०७ अंतर्गत गुन्हा दाखल करुन त्यांना निलंबित करावे.९)पोलिसांच्या कोंबिंग कार्यवाहीत निर्दोष जखमी झालेल्यांना तातडीने अर्थीक मदत करावी.१०)भारतीय संविधान शिल्पाची विटंबना करणा-या सोपान पवार यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.या मागण्यांचे निवेदन सर्व आंबेडकरी संघटनेच्या वतीने लोहा तहसिलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना देण्यात आले.यावेळी माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल,नगरसेवक तथा आंबेडकरी चळवळीचे नेते बबनराव निर्मले,आंबेडकरी चळवळीचे नेते बालाजी खिल्लारे,नगरसेवक तथा गट नेता पंचशिल कांबळे,रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिलदादागायकवाड,माजी नगरसेवक उत्तम महाबळे,भारतीय बौध्द महासभेचे जिल्हा सचिव रत्नाकर महाबळे,पत्रकार डी.एन.कांबळे, पत्रकार प्रदीपकुमार कांबळे,अनिल धुतमल,सतिष निखाते,केतन खिल्लारे,निखिल महाबळे,पत्रकार शिवराज दाढेल,सचिन आढाव,छगन हटकर,गिरीष भालेराव,नवनाथ आढाव आदी.उपस्थीत होते.

# पंचायत समित्यांतही रंगणार पॉलिटिकल वॉर!

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात महायुतीचे १० मतदारसंघात प्राबल्य वाढल्याने आता तालुका पंचायत समितीच्या सत्तेमध्येही मोठा फेरबदल पहायला मिळू शकतो, अशी चर्चा आहे. दरम्यान, विधानसभेचे वातावरण अजुनही गरम असल्याने या ठिकाणी नूतन आमदार हे आपल्या ताब्यात पंचायत समितीची सत्ता घेण्यासाठी प्रयत्न करणार आहेच मात्र पराभूत आमदारांचीही गणातील ताकद कमी नसल्याने या लढती लक्षवेधी ठरण्याचे संकेत आहेत.

जिल्ह्यात पंचायत समितीचे १५० गण आहेत. प्रत्येक तालुक्यात साधारणतः ४ ते ८गट तर ८ ते १६ गण आहेत. गटातील विजयी सदस्यांमधून जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडी होतात. तर पंचायत समितीच्या सदस्यांमधून सभापती व उपसभापती निवडले जातात. गेल्या पाच वर्षाचा आढावा घेतला तर २०१७ मध्ये झालेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीत बहुतांशी पंचायत समिती ह्या आघाडीच्या ताब्यात होत्या. पंचायत समितीमध्ये २०१७आणि २०२० अशा दोन टप्प्यात अडीच अडीच वर्षाचे सभापती व उपसभापती आरक्षण निघाले होते. त्यानुसार निवडी करण्यात आलेल्या होत्या. तर, २०२९ नंतर बदललेल्या राजकीय समिकरणानंतर काही पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकताना दिसला.

दरम्यान, अकोले पंचायत समितीची २०१७ मध्ये निवडणूक झाली. पहिली अडीच वर्षे सभापती व उपसभापती हे शिवेसेनेचे होते. त्यानंत्तर २०२० मध्ये अडीच वर्षासाठी दुसर्यांदा निवडी झाल्या. त्यावेळी माजी आमदार वैभव पिचड हे भाजपात दाखल झालेले होते. त्यांनी शेवटच्या टप्प्यात शिवसेनेकडून पंचायत समिती आपल्या ताब्यात घेत सभापती व उपसभापती हे भाजपाचे बसविले. दरम्यान, आज येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे किरण लहामटे हे आमदार आहेत. त्यामुळे पंचायत समितीसाठी येथे लहामटे-पिचड आणि भांगरेंच्या गटात सामना पहायला मिळेल.

कोपरगाव पंचायत समितीमध्ये २०१७ पर्यंत कोल्हे गटाचे वर्चस्व होते. मात्र फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीत पहिल्यांदाचा आशुतोष काळे यांनी कोल्हेंना सत्तेतून पायउतार केले. त्यामुळे प्रशासक येईपर्यंत दोन्ही अडीच अडीच वर्षे काळेंची अर्थात राष्ट्रवादीची सत्ता पहायला मिळाली. येणार्या निवडणुकीत आता पुन्हा काळे विरोधात कोल्हे यांचा संघर्ष पहायला मिळणार आहे.

संगमनेर पंचायत समितीवर आजतागायत माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचेच वर्चस्व दिसलेले आहे. शेवटच्या अडीच वर्षातील सभापती निवडीवेळी थोरात गटाच्या सभापती व उपसभापती पदाच्या उमेदवारांना १३-१३ तर विरोधी शिवसेनेच्या दोन्ही उमेदवारांना ५-५ मते मिळाली होती. या वेळी काँग्रेस जिंकली होती. आज चित्र बदलले आहे. येथे शिंदे गटाचे अमोल खताळ हे आमदार झाले आहेत.

श्रीरामपूर पंचायत समितीत २०१७ मध्ये आठ सदस्य आहेत. काँग्रेसचे चार सदस्य विजयी झाले होते. ओबीसी आरक्षण निघाले, काँग्रेसकडेच डॉ. वंदना मुरकुटे व संगीता शिंदे असे दोन ओबीसी सदस्य होते. सभापती निवडीवेळी संगीता शिंदे यांनी विरोधी सदस्यांची मदत घेवून सभापतीपद मिळवले. त्यामुळे संगीता शिंदे यांच्यावर अपात्रतेची कारवाईची मागणी झाली. त्यांच्यावर जिल्हाधिकार्यांनी अपात्रतेची कारवाई केली. त्यामुळे सात सदस्य राहिले. पुढेही अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. प्रकरण न्यायालयापर्यंत पोहचले. शेवटच्या टप्यात ही पंचायत समिती विखे गटाच्या ताब्यात आल्याची दिसली. आज आमदार पुन्हा काँग्रेसचे हेमंत ओगले झाले आहेत.त्यामुळे ससाणे गटाला ताकद मिळाली असून , येथे ससाणे, मुरकुटे गट विरोधात विखे-आदिक गट असा सामना पुन्हा पहायला मिळेल.

जामखेड पंचायत समितीच्या शेवटच्या टप्प्यातील सभापती निवडीवेळी मतमोजणी स्थगित करण्यात आली होती. राष्ट्रवादीच्या राजश्री मोरे व भाजपाच्या



मनिषा सुरवसे यांना समान मते मिळाली. त्यामुळे चिठ्ठी टाकण्यात आली. यात राष्ट्रवादी रोहित पवार गटाच्या मोरे ह्या नशीबवान ठरल्या होत्या. येथे आमदार रोहित पवार हे राष्ट्रवादीचे आमदार आहेत. भाजपाचे आ. प्रा. राम शिंदे यांच्याशी त्यांचे पुन्हा घमासान दिसणार आहे.

कर्जत पंचायत समितीत रोहित पवारांचे वर्चस्व दिसले होते. मनिषा जाधव यांची बिनविरोध वर्णी लागली होती.या निवडीवेळी भाजपचे दोन सदस्य गैरहजर होते.तर शिवसेनेचा एकमेव सदस्य हा देखील महाविकास आघाडीत आलेला होता. आताही येथे आ. रोहित पवार व राम शिंदे यांच्यात सत्तासंघर्ष पहायला मिळेल.

राहाता पंचायत समिती ही मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ताब्यात आहेत. येथे सर्वच्या सर्व १० सदस्य हे विखे गटाचे विजयी झालेले आहेत. नंदाताई तांबे आणि ओमेश जपे हे सभापती व उपसभापती होते. येथे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कायमच वर्चस्व दिसले आहे.

श्रीगोंदा पंचायत समितीत माजी मंत्री आमदार बबनराव पाचपुते यांच्या भाजपाचे सात तर दोन्ही काँग्रेसचे पाच सदस्य निवडून आले होते. येथे पहिल्या टर्मचे भाजपाचे सभापती पुरुषोत्तम लगड यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर २०२० मध्ये दुसरी टर्मच्या निवडीवेळी राष्ट्रवादीचे माजी आमदार राहुल जगताप यांनी चक्रे फिरवली. यात भाजपाच्या एका महिला सदस्याने अचानक आघाडीला पाठींबा दिला. त्यामुळे पाचपुतेंकडून जगताप यांनी पंचायत समिती राष्ट्रवादी-काँग्रेसकडे खेचून आणली.आता विद्यमान आमदार हे विक्रमसिंह पाचपुते आहेत. भाजपाच धुरा त्यांच्यावरच आहे. त्यांच्याविरोधात येथे शिवसेना ठाकरे गटाला साजन पाचपुते, राजेंद्र नागवडे हे ताकद देणार आहेत. तर राहुल जगताप हे राष्ट्रवादी शरद पवार गटाला ऊर्जितावस्थेत आणण्याचा प्रयत्न करताना दिसू शकतात.नेवासा पंचायत समितीत २०१७ ते २०२२ पर्यंत माजी आमदार शंकरराव गडाख यांचेच वर्चस्व दिसले. त्यांचे १४ पैकी १२ सदस्य निवडून आले होते.दोन्ही टर्मची अडीच अडीच वर्षे सभापती व उपसभापती निवडी ह्या बिनविरोध करण्यात आल्याचे दिसले होते.

मात्र आता नेवाशाचे आमदार हे शिंदे सेनेचे विठ्ठलराव लंघे आहेत. त्यांना भाजपाची मोठी ताकद मिळालेली आहे.त्यामुळे गडाखांच्या ताब्यातून पंचायत समिती काढून घेण्यासाठी आ. लंघे हे प्रयत्न करणार हे नक्की.शेवगाव पंचायत समितीत २०१७ च्या निवडणुकीत सर्व आठ जागांवर माजी आमदार चंद्रशेखर घुले यांचे सदस्य विजयी झाले होते. त्यामुळे पहिल्या व दुसर्या टर्ममध्येही क्षितीज घुले हेच सभापती होते. शेवटच्या अडीच वर्षात सभापती पद हे खुल्या गटाला मिळाल्याने त्यांचीच फेरनिवड करण्यात आली होती. आताही येथे घुले यांच्याविरोधात आमदार राजळेंचा गट एकमेकांसमोर उभा राहणार आहे. येथील लढतीही लक्ष वेधून घेणार्या ठरू शकतात.

राहुरी तालुक्यात पंचायत समितीचे १० गण आहेत. यात सहा गणात माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे सदस्य निवडून आले होते. तर विरोधी विखे-कर्डिले गटाचे चार सदस्य होते. येथे दोन्हीही टर्म तनपुरे गटाचाच वरचष्मा पाहायला मिळाला. मात्र आता आमदार म्हणून शिवाजी कर्डिले विजयी झाले.तनपुरेंचा पराभव झाला. त्यामुळे तनपुरेंकडील पंचायत समिती ताब्यात घेण्यासाठी विखे-कर्डिले गटातून ताकद लावली जाणार आहे

नगर पंचायत समितीत शिवसेना-काँग्रेसची तालुका विकास आघाडीचे ८, तर भाजपाचे ४ सदस्य होते. शिवसेनेच्या सुरेखा गुंड यांची सभापती व डॉ.दिलीप पवार यांची उपसभापती पदी बिनविरोध निवड झाली होती. आता आ. कर्डिले पुन्हा आमदार झाले आहेत. तर पारनेरमधून काशीनाथ दाते हे महायुतीचेच आमदार आहेत. तिकडे श्रीगोंद्यातून भाजपाचे पाचपुते आमदार आहेत.त्यामुळे नगर तालुक्यात भाजपाचे वर्चस्व पहायला मिळते.त्यामुळे पंचायत समिती गणातही हेच चित्र राहणार का, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

पाथर्डी पंचायत समितीत १० गण आहेत. आमदार मोनीका राजळे यांचे स्पष्ट बहुमत होते. त्यामुळे दोन्ही टर्मला या ठिकाणी भाजपाचे सभापती व उपसभापती पहायला मिळाले. येथे प्रताप ढाकणे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गट जिवंत ठेवला आहे. पंचायत समितीच्या गत निवडणुकीत अवघ्या एक-दोन जागांवर ढाकणेंना समाधान मानावे लागले होते. त्यात आताही राजळे ह्याच आमदार झाल्या आहेत. त्यामुळे पंचायत समितीसाठी ढाकणेंना मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत.

पारनेरमध्ये २०१७ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी व शिवसेनेला प्रत्येक चार-चार, तर काँग्रेसला दोन जागा मिळाल्या होत्या. शेवटच्या टप्यात ही पंचायत समिती नीलेश लंकेंकडे होती. मात्र आता राणी लंके यांचा पराभव झाला. काशीनाथ दाते हे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार झाले. त्यामुळे गट-गणातही येथे शरद पवारांची राष्ट्रवादी विरोधात महायुती असे सामने रंगलेले दिसणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077